झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/तां.१/झोपुआ/प्र.क्र.२०६/ १५३० /२०१७
दिनांक : २८/०८/२०१७

**"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. यश बिल्डकॉन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १८/०५/२०१५ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

प्रस्तावाच्या अनुषंगाने तहसिलदार तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं. ७२१, स.नं. ८८/४+१३८+१६१, प्लॉ.क्र. ५४,५५,५६, गुजराथ कॉलनी, कोथरुड, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. तहसिलदार तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि. २९/०५/२०१७ अन्वये सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर जमिनीवर एकूण १३१ झोपडीधारकांपैकी पात्र निवासी ८१, पात्र बिगर निवासी ०४ असे एकुण ८५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ८५ झोपडीधारकांनी (१००.००%) मे. यश बिल्डकॉन यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उप आयुक्त (परिमंडळ क्र. १), पुणे महानरपालिका यांनी



Scanned with CamScanner

झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल कार्यालयीन पत्र जा.क्र. उआप १/१२५८दि. २४/०२/२०१६ रोजी सादर केला असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं. ७२१, स.नं. ८८/४+१३८+१६१, प्लॉ. क्र. ५४,५५,५६, गुजराथ कॉलनी, कोथरुड, पुणे | ३२०८.९८ चौ. मी. | **पुर्वेस -** लागु व न.भू.क्र. ७२१ पैकी |
| | | **पश्चिमेस -** न.भू.क्र. ७२१ पैकी प्लॉ.क्र.५३ |
| | | **उत्तरेस -** रस्ता |
| | | **दक्षिणेस -** न.भू.क्र. ७२१ पैकी प्लॉ.क्र.५२ |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

(पांडूरंग पोले)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक - २८/०८/२०१७



Scanned with CamScanner